१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

# लोकशाही

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/

Download Our Apps



मोदकाचा राजा, लाडाचा गणेशा,
तुझ्याविना नाही कुणा सुखी देशा।
भक्तीच्या गजरात तुझा जयघोष,
विघ्नहर्ता बाप्पा, तूच आमुचा जोश।

जळगाव, गुरुवार, दि.४ सप्टेंबर २०२५ | RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024-26 | • अंक -२९५ • पाने ६ • किंमत ३ रु.

## सोने-चांदी

- **सोने** (प्रति १० ग्रॅम) : १,०६,८६०
- **चांदी** (प्रति १ किलो): १,२४,६५०

## तापमान

- **कमाल** : २७ अंश सेल्सिअस
- **किमान** : २३ अंश सेल्सिअस

## महत्वाचे



### पाचोऱ्यातुन वृद्ध महिला बेपत्ता

**पाचोरा :** पाचोरा शहरातील गाडगेबाबा नगर येथील रहिवासी सुलभा नेमिदास दलाल (वय - ५७ वर्ष) ही वृद्ध महिला १५ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास गाडगेबाबा नगर येथुन अचानक बेपत्ता झाली आहे. सुलभा दलाल यांचा सर्वत्र शोध घेतला असता मिळुन न आल्याने महिलेची मुलगी प्रतिक्षा नेमिदास दलाल यांच्या खबरीवरुन पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये हरविल्याची नोंद करण्यात आली असून सुलभा दलाल यांचा शोध पो. नि. राहुलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पो. कॉ. संदिप राजपूत हे घेत आहेत.

### एकाच वेळी पाच ठिकाणी छापेमारी

**धुळे :** अवैधरीत्या सावकारी करण्याचे प्रमाण वाढले आहे. याची माहिती मिळाल्यानंतर सहाय्यक निबंधक आणि पोलिसांनी छापेमारी करत कारवाई केली आहे. शिरपूर तालुक्यात एकाच वेळी पाच ठिकाणी अचानक छापेमारी केल्याने जिल्हाभरातील अवैधरीत्या सावकारी करणाऱ्यांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत. धुळ्याच्या शिरपूर तालुक्यात हि कारवाई करण्यात आली आहे. शिरपूरचे सहाय्यक निबंधक आणि शिरपूर पोलिसांना प्राप्त झालेल्या तक्रारी नुसार तक्रारदाराने पाच जणांकडून एकुण ९ लाख ९५ हजार रुपये व्याजाने घेतले होते. या पैशांची परतफेड करुन देखील पैशांसाठी तक्रादाराकडे घरी जाऊन अवैध सावकार तगादा लावत होते. वारंवार होत असलेल्या या त्रासाबाबत पोलिसात तक्रार दाखल केली होती. यातील काही अवैध सावकारांनी दहा टक्क्यांनी पैसे घेतल्याचे देखील तक्रारदाराने म्हटले आहे. या घटनेनंतर पोलीस आणि साहाय्यक निबंधक यांच्यावतीने पाच पथके बनवून एकाच वेळेला पाच अवैध सावकारी करणाऱ्यांच्या घरी छापेमारी करत घरझडती घेण्यात आली. यातील काही अवैध सावकारांच्या घरी, वेगवेगळ्या डायरी, कोरे चेक, पावत्या, स्टॅम्पसह इतर दस्तावेज मिळून आले आहेत. हे सर्व साहित्य पोलिसांनी जप्त केले आहे.

### एकाच वेळी पाच ठिकाणी छापेमारी

**धुळे :** अवैधरीत्या सावकारी करण्याचे प्रमाण वाढले आहे. याची माहिती मिळाल्यानंतर सहाय्यक निबंधक आणि पोलिसांनी छापेमारी करत कारवाई केली आहे. शिरपूर तालुक्यात एकाच वेळी पाच ठिकाणी अचानक छापेमारी केल्याने जिल्हाभरातील अवैधरीत्या सावकारी करणाऱ्यांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत.

# दिव्यांगांच्या अर्थसहाय्यात एक हजार रुपयांची वाढ

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकित उर्जा, नगरविकास, विधी व न्याय विभागाशी संबंधित महत्वाचे निर्णय

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

राज्य मंत्रिमंडळाची आज महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत उर्जा विभाग, नगरविकास विभाग, विधी व न्याय विभागाशी संबंधित काही निर्णय घेण्यात आले. मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयांनुसार आता अनुसूचित जमातीतील नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांना केंद्राची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू होणार आहे. तसेच श्रावणबाळ आणि संजय गांधी निराधा योजनेअंतर्गत दिव्यांगांना मिळणाऱ्या रकमेत थेट १००० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. पुणे मेट्रोवरील बालाजीनगर, बिबवेवाडी या दोन नवीन स्थानकांना मंजुरी देण्यात आली आहे. या महत्त्वाच्या निर्णयांसह इतरही काही निर्णय घेण्यात आले आहेत. आता संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेतील दिव्यांगांच्या अर्थसहाय्यात १ हजार रुपयांची वाढ करण्यात आली आहे. लाभार्थ्यांना दरमहा दीड हजार ऐवजी आता अडीच हजार रुपये मिळणार आहेत. महानिर्मिती कंपनीच्या औष्णिक विद्युत



निर्मिती केंद्रातील राखेच्या वापराबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ मध्ये सुधारणा करण्यात आली असून कारखाने अधिनियम, १९४८ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. अनुसूचित जमातीतील नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेऐवजी केंद्र सरकारची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करणार आहेत. मुंबईतील आणिक डेपो- वडाळा ते गेटवे ऑफ इंडिया या मेट्रो मार्गिका- ११ प्रकल्पास मान्यता. २३ हजार ४८७ कोटी ५१ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ठाणे वर्तुळाकार मेट्रो, पुण्यातील मेट्रो मार्गिका २, मार्गिका ४ तसेच नागपूर मेट्रोच्या टप्पा दोनच्या कर्जास मान्यता. ठाणे अंतर्गत वर्तुळाकार मेट्रो प्रकल्प, पिंपरी-चिंचवड ते निगडी मेट्रो रेल्वे कॉरीडॉर, स्वारगेट ते कात्रज मेट्रो रेल्वे कॉरीडॉर, वनाज ते रामवाडी (मार्गिका क्र. २) च्या विस्तारीत मार्गिका वनाज ते चांदणी चौक व रामवाडी ते वाघोली (विठ्ठलवाडी), पुणे मेट्रो मार्ग-४ (खडकवासला स्वारगेट हडपसर-खराडी) आणि नळ स्टॉप वारजे-माणिकबाग (उपमार्गिका) व नागपूर मेट्रो रेल्वे टप्पा-२ या मेट्रो रेल्वे प्रकल्पांसाठी

पान २ वर »

# भटक्या व मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चाळीसगाव** प्रतिनिधी



शहरातील भटके व मोकाट जनावरांची समस्या दिवसेंदिवस जटील होत चाललेली आहे. पायी चालणारे नागरिक विद्यार्थी सायकल स्वार दुचाकी स्वार नागरिकांना आता मोठ्या प्रमाणात भीतीच्या सावटाखाली वावरतांना दिसत आहे. मध्यंतरी नगरपालिकेने एका एजन्सी मार्फत भटके व मोकाट जनावरे पकडण्याची मोहीम हाती घेतली होती. परंतु ती मोहीम फक्त दिखाऊ व प्रसिद्धीसाठी होती असेच दिसते. कारण आजही शहरात मोठ्या प्रमाणात भटके व मोकाट जनावरे मुख्य रस्ता तसेच गल्ली मध्ये खुलेआम फिरताना तसेच झूंडीने रस्त्यावर बसलेले दिसत आहे. त्याबाबत काही फोटो व व्हिडिओ दाखवण्यास तयार आहोत तसेच आपण जी एजन्सी नेमली आहे. ती खरंच काम करते आहे की फक्त बिले सादर करून आपली खळगी भरत आहे. याची देखील चौकशी झाली पाहिजे. भटक्या व मोकाट जनावरांमुळे शहरात उद्या जर काही अप्रिय घटना घडल्यास यास सर्वस्वी प्रशासक म्हणून आपण जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी. अन्यथा

पान २ वर »



## : लोकशाहींच्या श्रींची महाआरती :

**दै. लोकशाहीच्या श्रींच्या आरती प्रसंगी उपस्थित श्रुती बामणोदकर, पुष्कर यावलकर, शुभांगी यावलकर, राजेश यावलकर, शांता वाणी, कमलाकर वाणी, प्रतिमा बामणोदकर, संदीप बामणोदकर, निलेश वाणी, नितीन खरे,अर्चना खरे, आरती खरे**

# सरकारच्या जीआरविरोधात कोर्टात जाणार

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

मराठा आरक्षण आंदोलनानंतर सरकारच्या शासन निर्णयानंतर ओबीसी समाजामध्ये नाराजी पसरल्याचं दिसत आहे. ओबीसी नेते, मंत्री छगन भुजबळ यांनी मंत्रिमंडळाच्या कॅबिनेट बैठकीवरही बहिष्कार घातला. दुसरीकडे सरकारच्या शासन निर्णयाच्या पार्श्वभूमीवर ओबीसी नेत्यांची बैठक झाली. या बैठकीनंतर नाराज असलेल्या छगन भुजबळ यांनी शासन निर्णयाविरोधात कोर्टात जाणार असल्याची भुमिका स्पष्ट केली. ओबीसी कार्यकर्त्यांना आंदोलन, उपोषण थांबवण्याचं आवाहन मंत्री छगन भुजबळ यांनी केलं. मंत्री छगन भुजबळ यांनी ओबीसी समाजाची बाजू घेत आरक्षणाच्या मुद्द्यावरून आक्रमक भूमिका घेतली आहे. शासन निर्णयाच्या पार्श्वभूमीवर ओबीसी नेत्यांची देवगिरी बंगल्यावर महत्वाची बैठक झाली. छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठर पार पडली. या बैठकीत शासन निर्णयाच्या



विरोधात कोर्टात याचिका दाखल करण्याचे ठरले आहे. त्यानुसार, ओबीसी नेत्यांकडून सरकारच्या शासन निर्णयाविरोधात सोमवारी किंवा मंगळवारी कोर्टात याचिका दाखल केली जाणार आहे. छगन भुजबळ यांनी भूमिका स्पष्ट केल्याने सरकारच्या शासन निर्णयाविरोधात ओबीसी समाजाचे नेतेही तीव्र भूमिका घेणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मराठा आरक्षणासंदर्भात शासनाने काढलेल्या जीआर विरोधात ओबीसी समाज जालन्यात आक्रमक झाला आहे. मराठा आरक्षणासंदर्भात काढलेल्या जीआर जालन्यात ओबीसी बांधवांनी फाडून पायदळी तुडवला आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची मागणी मान्य करत काल राज्य सरकारने जीआर काढला आहे.

पान २ वर »

# मराठा आरक्षण निर्णयाबाबत भडगावात आनंदोत्सव

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**भडगाव** प्रतिनिधी



मराठा आरक्षणासंदर्भात मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या मागण्या राज्य कारने मान्य केल्याने भडगाव शहरातील मराठा समाज व इतर समाजातील व्यक्तींनी आनंदोत्सव साजरा केला. आज सकाळी दहा वाजता शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मराठा समाज बांधव व इतर समाज बांधव एकत्र जमले आणि त्यांनी ढोल ताशाच्या गजरात आपला आनंद व्यक्त केला. हा निर्णय मराठा समाजाच्या एकजुटीचा विजय असल्याने यावेळी दिसून आले. यावेळी अखिल भारतीय मराठा महासंघ भडगाव तालुका कार्याध्यक्ष चेतन पाटील, कुणबी मराठा पाटील समाज अध्यक्ष डॉ. विलास पाटील, राजेश सोनवणे, जगदीश शिंदे, मा. नगरसेविका योजना पाटील, डी. डी. पाटील, विजयकुमार भोसले, मा. नगराध्यक्ष प्रशांत पवार, विक्रम सोनवणे, आतिश पाटील, जितेंद्र आचारी, भारत मुक्ती मोर्चाचे जाकीर कुरेशी, संजय

पान २ वर »

# नगरपरिषदेत बारा पैकी तीन प्रभागातून सात हरकती

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**भडगाव** प्रतिनिधी



नगरपरिषदेच्या प्रारूप प्रभागाच्या भौगोलिक सीमा नुकत्याच प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. १८ ते ३१ ऑगस्ट पर्यंत प्रभागांच्या हरकती मागवण्यात आल्या होत्या. मुदत अखेर त्यावर केवळ ३ प्रभागात ७ हरकती पालिकेकडे प्राप्त झाल्या आहेत. शहरात एकूण १२ प्रभाग रचना करण्यात आले आहे. त्यावर केवळ सात हरकती आल्या आहेत. यात प्रभाग क्र. ७ बाबत ३ तर प्रभाग क्र.

पान २ वर »

# साकळी येथे विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण कार्यक्रम

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मनवेल ता. यावल** प्रतिनिधी

साकळी येथील शारदा विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात कै. वसंतराव रामजी महाजन यांच्या स्मृतिदिनानिमित्त विविध स्पर्धांचे तसेच वर्षभरात राबविलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरणाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. जे. महाजन यांनी केले



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यावल पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी विश्वनाथजी धनके होते. शिक्षण विस्तार अधिकारी मंगला सपकाळे, , संस्थेच्या अध्यक्षा विद्या महाजन, उपाध्यक्ष सुभाष महाजन, कार्याध्यक्ष प्रमोद सोनवणे, संचालक शामकांत महाजन, सर्व संचालक मंडळ, विद्यालयाचे प्राचार्य आर जे महाजन, पर्यवेक्षक एस जे पवार, बी ई महाजन, आर सी जगताप, एन पी पाटील विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

पान २ वर »



# रावेर तालुक्यात मराठा आरक्षणाबाबत जल्लोष

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**रावेर** प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने मराठा समाजाला आरक्षण जाहीर केल्याने रावेर तालुक्यात भारतीय जनता पार्टीच्या वतीने जल्लोष व आनंदोत्सव साजरा करण्यात आला. या प्रसंगी महायुती सरकारचे आणि महाराष्ट्राचे जाणते मुख्यमंत्री माननीय देवेंद्रजी फडणवीस तसेच उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उप मुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार व्यक्त करण्यात आले आमदार अमोल जावळे यांचेही

पान २ वर »

# सोमय्या यांच्या मागणीवरून 43 जणांवर गुन्हे दाखल

## जळगाव जन्म प्रमाणपत्र घोटाळा...

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

शहरातील चर्चेत असलेल्या जन्म प्रमाणपत्र घोटाळ्याचा तपास आता निर्णायक टप्प्यात पोहोचला आहे. या प्रकरणात पोलिसांनी दाखल केलेल्या आणि आरोपपत्रामध्ये एकूण ४५ जणांना आरोपी म्हणून नामांकित केले असून त्यामध्ये ४३ अर्जदार आणि २ वकील/एजंट यांचा समावेश आहे. या अर्जदारांनी बनावट पद्धतीने तहसीलदार जळगाव यांच्या स्वाक्षऱ्या करून, खोटे आदेश तयार केले आणि ते आदेश जळगाव महानगरपालिकेत सादर करून बनावट जन्म



प्रमाणपत्रे प्राप्त करण्यासाठी दाखल करण्यात आली होती. या गुन्ह्यातील कारस्थानामुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली होती. एकाच वेळी महानगरपालिकेत जन्म मृत्यू दाखले प्रकरणे ५० कसे दाखल झाली याबाबत तहसीलदार जळगाव तालुका यांनी जळगाव शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला होता.

गंभीर गुन्ह्यात ४३ आरोपीची वाढ झाली आहे. यात शिरीष बानो फारीक शाह, आरीफ खान इसा खान, बान असुदुल्ला खान हाफीज, शाह आसिफ अहमद, शमशेर बेग तुराब वेग, तौसीफ शहा जनिउल्ला शाहा, तुराब वेग गुलाब वेग, शहनाज वी. शेख मुनीर, वाहेदाबी अब्दुलगनी, अब्दुल्ला असगर अली सैय्यद, नुसरत बानो, जबीउल्ला शाहा, शाहा आयाज अहमद अब्दुल अजीज, मोहम्मद वसीम जबीमुल्ला शाहा, मोहम्मद जफर जवीउल्ला शाहा, जनीक परवीन अमानउल्ला शाहा, बिसमिल्लाह खान, शेख सलीम शेख बसीर, शेख अनीस शेख बसीर, मोहम्मद अकील शेख बसीर, मोहम्मद कलीम शेख बसीर, शरीफ नईमोद्दीन, मोहम्मद शकील शेख बसीर, अमरीन रशिद पटेल, जाकीर फकीर मोहम्मद तांबोळी, तबस्सुम परवीन मोहम्मद इकबाल, शेख मोहम्मद इकबाल अब्दुल रहीम, राहत नाज जबीउल्ला शाहा, अंजुमबी शेख फरीद, तसलीमा बी शेख यासिम, शोहरत अली शरीफ मुनसारी, शेख शानदोस शेख ईसाक, चांद मोहम्मद प्यारजी बागवान, असलम खान सादीक खान, अशफाक

पान २ वर »

# गोदावरी पाटील यांचे निधन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी



समाजसेवक, शिक्षण क्षेत्रातील दीपस्तंभ असलेल्या गोदावरी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार डॉ. उल्हास पाटील, सुभाष व प्रमिला यांच्या मातोश्री श्रीमती गोदावरी पाटील यांचे आज दि. ३ सप्टेंबर रोजी दुपारी १: ३४ वाजता दुःखद निधन झाले आहे. मातोश्रींच्या संस्कारांनी, मार्गदर्शनाने आणि आशीर्वादाने डॉ. उल्हास पाटील यांना जीवनात प्रेरणा मिळाली, त्या गोदावरी पाटील यांच्या दुःखद निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. शांत, संयमी, प्रेमळ स्वभाव आणि कुटुंब, समाजासाठी दिलेले योगदान हे सदैव प्रेरणादायी राहील. उद्या गुरुवार दि. ४ रोजी सकाळपर्यंत अंतिम दर्शनासाठी पार्थिव गोदावरी हॉस्पिटल, भास्कर मार्केट येथे ठेवण्यात येणार आहे. दुपारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येतील. माजी खासदार डॉ. उल्हास पाटील यांच्या आई तर भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा डॉ. केतकी पाटील यांच्या आजी होत.